नियमित दिवाणी दावा क्र. २७/२०२० मध्ये निशाणी क्र. २१ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज, वादी यांनी, दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ३२ नियम १२ व आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, त्यांनी प्रस्तुतचा दावा वाटप व पृथक कब्जा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादी क्र.१ ही, वादी क्र.२ व ३ यांची आई असून, दावा दाखल करतेवेळी वादी क्र.२ व ३ हे अज्ञान होते. त्यामुळे दाव्याच्या सरनाम्यामध्ये, वादी क्र.१ कल्पना जयजयराम शिंदे यांची वादी क्र.२ व ३ यांचे अज्ञान पालक जनक आई म्हणून नेमणूक केलेली होती. परंतु, वादी क्र.२ याची जन्मतारीख २७.०३.२००६ आहे व तो सज्ञान झालेला आहे. त्यामुळे वादी क्र.१ यांना डिस्चार्ज करण्याची विनंती केली आहे. तसेच दाव्याच्या सरनाम्यामध्ये, वादी क्र. २ याचे वय '१४ वर्षे' यास काट देऊन, त्याऐवजी वय '१९ वर्षे,' तसेच 'वादी क्र.२ व ३ चे अपाक म्हणून जनक आई' यास काट देऊन, त्याऐवजी 'वादी क्र. ३ चे अपाक म्हणून जनक आई' असे लिहिण्यात यावे, अशी विनंती केली आहे. सदरची दुरुस्ती किरकोळ स्वरुपाची असून, सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही, सदर दुरुस्तीमुळे वादी व प्रतिवादी यांना दाव्याचे कामकाज चालवणे सोपे जाणार नाही, त्यामुळे दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, अर्जातील मजकूर योग्य नाही, त्यामुळे तो त्यांना मान्य व कबूल नाही. सदर अर्ज देण्यास बराच उशीर केलेला आहे, त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

४. वादींचा अर्ज व प्रतिवादींचे म्हणणे यांचे अवलोकन केले. सदर दावा हा वाटप व पृथक कब्जा मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. दाव्याच्या सरनाम्याचे अवलोकन करता, वादी क्र.१ ही वादी क्र. २ व ३ यांची अपाक म्हणून जनक आई, तसेच, वादी क्र.२ चे वय १४ वर्षे नमूद केल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.२ हा सज्ञान झाल्यामुळे,

वादी मागणी करतात त्याप्रमाणे वादी क्र.१ यांना, वादी क्र.२ करीता डिस्चार्ज करणे व त्यानुसार दुरुस्तीसाठी परवानगी देणे आवश्यक ठरते. सदर दुरुस्ती तांत्रिक स्वरुपाची आहे. जरी प्रस्तावित दुरुस्ती मंजूर केल्यास, प्रतिवादींचे कुठलेही नुकसान होणार नाही, याशिवाय दाव्याच्या स्वरुपात कुठलाही बदल होणार नाही व उभय पक्षातील वादाचे कायमस्वरुपी निराकरण करणे सोयीचे होईल. अशा परिस्थितीत, दावा गुणदोषावर निकाली करण्याकरीता, प्रस्तावित दुरुस्ती मंजुर करणे न्यायोचित्त होईल. सबब, खालील आदेश पारीत करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होईल.

आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादी यांनी पुढील तारखेपर्यंत, प्रस्तुत अर्जात मागितल्याप्रमाणे दाव्याच्या सरनाम्यात दुरुस्ती करुन, दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

PATIL VRUSHALI KISANRAO

Digitally signed by PATIL VRUSHALI KISANRAO
Date: 2026.03.02 17:10:28 +0530

(व्ही.के. पाटील)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मंगळवेढा.

दिनांक : ०२.०३.२०२६

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Order are same word to word as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : S.M. Gaddam |
| (b) | Court | : Civil Judge Jr. Div., Mangalwedha. |
| (c) | Date of Order | : 02-03-2026 |
| (d) | Order uploaded on | : 02-03-2026 |